[इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचे मराठीमध्ये भाषांतर]

सुप्रिम कोर्ट रिपोर्ट्स [१९५९ पुरवणी पान नं.१३३]

पी. कृष्ण मेनन

विरुद्ध

आयकर आयुक्त, म्हैसूर, त्रावणकोर-कोचीन आणि कुर्ग, बंगळुरू

(न्या. व्यंकटराम अय्यर, न्या. गजेंद्रगडकर आणि न्या. ए. के. सरकार)

प्राप्ती कर- नफा कमावण्याच्या हेतूशिवाय वेदांत शिकवणारा करदाता-व्यवसाय करत असेल तर- शिष्याने पैसे भेट देणे- अशी प्राप्ती म्हणजे व्यवसायातून मिळणारे उत्पन्न आहे का- प्राप्तीकर अधिनियम (१९२२ चा ११ वा) कलम १०.

करदाता हा आपल्या शिष्यांना नफा कमावण्याच्या कोणत्याही हेतूशिवाय वा उद्देशाशिवाय वेदांत तत्त्वज्ञान शिकवत होता. त्याच्या एका शिष्याने त्याला अनेक प्रसंगी पैशांची भेट दिली. करदात्याने प्रतिपादीत केले की तो कोणताही व्यवसाय करीत नसल्यामुळे आणि मिळालेली प्राप्ती ही नफा किंवा वाढ नसल्यामुळे प्राप्त रकमेवर कर लावण्यास तो जबाबदार नाही.

निर्णय दिला की: वेदांत शिकवताना करदाता हा एक व्यवसाय करत होता. एखादा उपक्रम हा व्यवसाय मानण्यासाठी तो उपक्रम संगठीत असणे किंवा त्याचा उद्देश नफा कमविणे असायला हवे असे आवश्यक नाही.

अंतर्देशीय महसुल आयुक्त विरुद्ध इंकॉर्पोरेटेड कौंसिल ऑफ लॉ रिपोर्टींग (१८८८) ३ टॅक्स केसेस १०५, ११३ हे अनुसरले गेले.

असा सुद्धा निर्णय दिला की: शिष्याकडून मिळालेली रक्कम ही करदात्याने व्यवसायातून मिळविलेली कमाई आहे. ऐच्छिक रकमेच्या बाबतीत जर ती रक्कम प्राप्तकर्त्यास त्याच्या व्यवसायाच्या संबंधाशिवाय वैयक्तिक हेतुसाठी मिळाली असती तर त्यावर कर लादता आला नसता मात्र जर ते करदात्याच्या व्यवसायामुळे किंवा पदधारणेमुळे मिळाले असेल तर ते करपात्र राहिल. प्राप्तकर्त्याला काय वाटत होते असा नव्हे तर प्राप्त्यकर्त्याने ती रककम का स्विकारली हा प्रश्न आहे. प्रस्तुत प्रकरणात हे स्पष्ट आहे की शिकवणीमुळेच ही भेट देण्यात आली होती.

दिवाणी अपीलीय अधिकारक्षेत्र: दिवाणी अपील क्र. ४०१/१९५६.

एर्नाकुलम येथील त्रावणकोर-कोचीन उच्च न्यायालयाच्या प्राप्तीकर संदर्भ क्र. १९५४ चा २४ मधील दि. ८ मार्च १९५६ च्या निर्णय व आदेशातून मिळविलेल्या विशेष अनुमतीद्वारे अपील

ए. व्ही. विश्वनाथ शास्त्री, एस. आर. गणपती, जे. बी. दादाचनजी अपीलकर्त्यासाठी

के. एन. राजगोपाल शास्त्री, आर. एच. ढेबर आणि डी. गुप्ता सामनेवालांसाठी

दि. ०७ ऑक्टोंबर १९५८ रोजी या न्यायालयाचा निकाल न्या. सरकार यांनी दिला –

पुर्वीच्या त्रावणकोर राज्याच्या सेवेत पोलीस अधीक्षक असलेले अपीलकर्ते १९४० मध्ये कधीतरी निवृत्त झाले. निवृत्तीनंतर ते वेदांत तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यात आणि ते समजून घेण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तींना ते शिकविण्यात आपला वेळ घालवत होते. लवकरच त्यांचे अनेक शिष्य झाले. लंडनचे जे. एच . लेव्ही हे त्यापैकी एक. लेव्ही आणि इतर जण अपीलकर्त्याकडून वेदांताचे पाठ घेत असत. ते नियमित अंतराने इंग्लंडहून त्रावणकोरला येत असत आणि तेथे काही महिने मुक्काम करून अपीलकर्त्याने दिलेल्या प्रवचनांना हजेरी लावत असत आणि वेदांतावरील त्यांच्या शिकवणुकीचा फायदा घेत असे.

लेव्ही यांचे मुंबईतील लॉईड्स बँकेत खाते होते. १३ डिसेंबर १९४१ रोजी त्याच बँकेत

अपीलकर्त्याला त्याच्या नावाने खाते उघडायला लावून लेव्ही याने त्याच्या खात्यातील संपूर्ण शिल्लक रक्कम रुपये २,४१,१०३,१३-३ अपीलकर्त्याच्या खात्यात हस्तांतरीत केली. त्यानंतर, वेळोवेळी लेव्हीने मुंबईतील लॉईड्ड बँकेमधील अपीलकर्त्याच्या वरील खात्यात आणखी रक्कम टाकल्या. १९ ऑगस्ट १९५१ पर्यंत अशा प्रकारच्या रु. ४,५०,००० च्या रकमा टाकण्यात आल्याचे आढळून आले. अपीलकर्त्याने वेळोवेळी त्याच्या मुंबईतील लॉईड्ड बँकेमधून त्याच्या त्रावणकोरमधील त्रिवेंद्रम येथील बँकेतील खात्यात त्या रकमा हस्तांतरीत केल्या.

मल्याळम युग ११२२, ११२३ आणि ११२४ याकरिताच्या करनिर्धारणासाठी विरोधात देण्यात आलेल्या करनिर्धारणाच्या आदेशावरील हे अपील आहे. ग्रेगोरियन दिनदर्शिकेनुसार संबंधित लेखांकन कालावधी १७ ऑगस्ट १९४५ ते १६ ऑगस्ट १९४६, १७ ऑगस्ट १९४६ ते १६ ऑगस्ट १९४७ आणि १७ ऑगस्ट १९४७ ते १६ ऑगस्ट १९४८. या काळात लेव्हीने १३,३०४/- रुपये, २९,९४८/- रुपये आणि रु. १९,९८३/- अशा रकमा मुंबईच्या लॉयड बँकेतील खात्यात जमा केल्या होत्या याच कालावधीत अपीलकर्त्याने आपल्या मुंबई खात्यातून रु.८१,०००/-, रु. ४७,०००/- आणि रु. ३७,२५१ इतक्या रकमा आपल्या त्रिवेंद्रम खात्यात हस्तांतरित केल्या. आयकर अधिकारी, त्रिवेंद्रम यांनी अपीलकर्त्यास नंतरच्या रकमेवर परकीय उत्पन्न, म्हणजेच भारतात उत्पन्न होणारे उत्पन्न म्हणून कर लावण्याचे मूल्यांकन केले आणि संबंधित कालावधीत त्रावणकोर राज्यात आणले. अपीलकर्त्याने या मूल्यांकन आदेशांवर अपीलीय सहाय्यक आयुक्तांकडे अपील केले त्यांनी ते एका अपीलात एकत्रित केले. अपिलीय सहाय्यक आयुक्तांनी अपील फेटाळून लावत प्राप्तिकर अधिकाऱ्यांच्या आदेशावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर अपीलकर्त्याने अपिलीय न्यायाधिकरणाकडे दाद मागितली परंतु ते अपीलही अयशस्वी ठरले.

त्यानंतर अपीलकर्त्याने न्यायाधिकरणाकडून खालील प्रश्न त्रावणकोर उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविण्याचा आदेश मिळविला :

१. जॉन एच. लेव्ही यांच्याकडून प्राप्त रकमा त्रावणकोर प्राप्तीकर अधिनियम, ११२१ अंतर्गत

करपात्र आहेत का? आणि

२. वर नमुद केल्यानुसार १९४१ पासुन जॉन एच. लेव्ही याने कररात्याच्या मुंबई येथील बँक खात्यात टाकलेल्या रकमा त्याला त्रावणकोर राज्याच्या बाहेरुन मिळाल्याबाबत ठरवलेल्या मतासाठी प्राधिकरणाकडे महत्वपुर्ण अभिलेख उपलब्ध होते का?

उच्च न्यायालयाने पहिल्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले मात्र दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर अपीलकर्त्याच्या बाजुने देवून मत ठरवले की तो त्रावणकोर राज्यात व्यवसाय-उदीम करत होता, आणि त्यातून मिळालेल्या रकमा ह्या त्रावणकोरमध्ये मिळविलेल्या असल्याचे मानायला हवे, आणि त्यामुळे अपीलकर्त्याने त्रावणकोरमध्ये आणलेल्या रकमेवर नव्हे तर संबंधित कालावधीत लेव्हीने मुंबई येथील त्याच्या खात्यात भरलेल्या रकमेवर कर आकारला जाण्यास तो जबाबादार आहे. उच्च न्यायालयाने पहिल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तराविरोधात अपीलकर्ता याने आता विशेष परवानगीने या न्यायालयात अपील दाखल केले आहे. या अपिलात दुसऱ्या प्रश्नाला दिलेले उत्तर आमच्या विचारार्थ नाही कारण ते उत्तर अपीलकर्त्याच्या बाजूने देण्यात आलेले आहे आणि त्याविरोधात प्राधिकरणाने कोणतेही अपील केलेले नाही.

ह्या प्रकरणात काही किचकटपणा आहे असे आम्हाला वाटत नाही. त्रावणकोर प्राप्तीकर अनिनियम, ११२१ (मल्याळी युग) च्या आधारे तो निर्णय घेतलेला आहे मात्र त्या कायद्यातील तरतुदी सध्यापुरते, भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२ प्रमाणेच असल्याने त्याच्याच तरतुदींचा संदर्भ घेणे अधिक सोयीस्कर ठरेल.

अपीलकर्त्याची बाजू मांडताना श्री. शास्त्री यांनी म्हटले आहे की, या खटल्यात वास्तविकत: दोन मुद्दे आहेत: पहीला की, अपीलकर्ता व्यवसाय करीत होता का ? आणि दुसरं म्हणजे जर करत असेल तर विचाराधीन रकामेला त्याच्या व्यवसायातील नफा किंवा वाढ असे म्हटले जाईल का? त्यांच्या या प्रकरणाच्या मताशी आम्ही सहमत आहोत आणि या मुद्द्यांवर चर्चा

करण्यास पुढे जातो.

पहिला प्रश्न असा आहे की, अपीलकर्ता हा व्यवसाय करत होता का? प्राप्तिकर अधिनियम १९२२ च्या कलम १० अन्वये करदात्याला त्याने केलेल्या कोणत्याही व्यवसाय किंवा उदिमच्या वाढ किंवा नफ्यावर कर भरावा लागतो. तथ्य असे आढळले की अपीलकर्ता स्वत: वेदांत तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत होते आणि आपल्या अभ्यासाच्या परिणामी मिळवलेले ज्ञान तो ते ज्ञान आत्मसात करण्यास उत्सुक असलेल्यांना द्यायचा. असे दाखविण्यास कोणताही पुरावा नाही अपीलकर्त्याने अट टाकली होती की जो त्याला पैसे दईल त्यालाच तो ते ज्ञान देइल. म्हणून आम्ही या आधारावर पुढे जातो की अपीलकर्ता अशा कृतीतून नफा कमावण्याच्या कोणत्याही हेतूशिवाय किंवा उद्देशाशिवाय उच्च शिष्यांना वेदांत शिकवत होता.

अध्यापन हा व्यवसाय नसला तर उदिम आहे, असे मानण्यात आपल्याला काहीच अडचण आढळत नाही. हे इतके सरळ आहे की त्याबाबत 'उदिम' या शब्दाच्या विविध अर्थांवर चर्चा करणे किंवा या मताचे समर्थन करण्यासाठी न्यायनिवाड्यांचा हवाला देणे गरजेचेसुद्धा नाही तसेच अध्यापन हे जर उदीम असेल, तर वेदांताचे अध्यापन हे उदीम नसावे, असे मानण्याचे कोणतेही कारण सापडत नाही. हे इतर कोणत्याही शिकवणीसारखेच असल्यामुळे एक उदीम आहे. असे म्हटले गेले की वेदांत शिकवतांना अपीलकर्ता हा केवळ धर्माचे आचरण करीत होता. धर्माचा भाग म्हणून वेदांताची शिकवण ही उदीम का नसावी, हे आम्हाला कळलेले नाही. ऐरवी असा प्रश्न निर्माण होत नाही की अपीलकर्ता हा वेदांत शिकविण्यात धर्माचे आचरण होता की कसे, हा वस्तुस्थितीचा शोध आहे. असे असू शकते की, वेदांत हे धर्माचरण म्हणून शिकवले जाऊ शकते परंतु ते इतर कोणत्याही तत्त्वज्ञान किंवा विचारसरणीप्रमाणे देखील शिकवले जाऊ शकते. वेदांत शिकवताना अपीलकर्ता धर्माचे आचरण करीत होता असे कथन सदर प्रकरणात कोठेही नमुद नाही.

असे मांडले गेले की, कायद्याच्या दृष्टीने एखाद्या कृतीला उदीम म्हणता यावे, यासाठी ती

एक संघटित कार्य आहे आणि ते नफा कमावण्याच्या हेतूने केले असलेले आहे हे दाखवावे लागते; आणि अपीलकर्त्याचे वेदांत शिकविण्याचे कार्य हे संघटीत ही नव्हते किंवा नफा कमविण्याच्या हेतूनेसुद्धा केले गेलेले नव्हते. तो उदीम करत आहे असे म्हणता येणार नाही. असे असे मांडले गेले की 'उदीम' हा शब्द व्यापार व व्यवसाय या शब्दांसोबत वापरला गेला असल्याने आणि व्यापार व व्यवसायाचा हेतू हा नफा कमविणे असा असल्याने नफा कमविणे असा हेतू असलेल्या कृतीच फक्त 'उदीम' या शब्दात समाविष्ट होतील. आम्हाला वाटते की ह्या कथनात काही तथ्य नाही. उदीम म्हटले जाण्यासाठी एखादी कृती ही संघटीतच असायला हवी असे म्हणण्याचे महत्त्व आम्हाला पटत नाही. त्याद्वारे निरंतर किंवा आधी म्हटल्याप्रमाणे संघटीत कृती असे समजायचे असेल तर आम्हाला नमुद करावे लागेल की एखादी एकल कृतीसुद्धा व्यापार किंवा व्यवसाय करणे असू शकते. अपीलकर्त्याच्या कार्यांमध्ये कोणतीही व्यवस्था अथवा निरंतरतेचा अभाव आम्हाला आढळून आलेला नसल्याने ह्या प्रश्नावर अधिक चर्चा करणे गरजेचे नाही. अपीलकर्त्याने मोठ्या संख्येने शिष्यांना गोळा केले होते आणि त्यांना तो नियमितपणे वेदांताचे शिक्षण देत होता. अपीलकर्त्याकडून वेदांताचे पाठ घेण्यासाठी लेव्ही हा नियमित कालावधीनंतर इंग्लंडहून येत असे. या सगळ्यातून संघटन आणि व्यवस्था स्पष्टपणे दिसून येते.

हे पुन्हा, सर्वसामान्य तत्व आहे की, व्यक्तीच्या कार्य करण्याच्या हेतूवरुन ती व्यक्ती व्यापार, व्यवसाय किंवा उदीम असल्याचे ठरत नाही. जर व्यापार, व्यवसाय किंवा उदीम हे प्रत्यक्षात उत्पन्न देत असेल तर ते कोणतेही उत्पन्न निर्माण करण्याच्या हेतूशिवाय चालविले गेलेले असले तरी ते उत्पन्न करपात्र आहे. आमचा विश्वास आहे की हे यापुढे प्रश्नांकित केल्या जाणाऱ्या निवाड्यांनीसुद्धा सर्वमान्य केले आहे. १८८८ च्या सुरुवातीला अंतर्देशीय महसूल आयुक्त विरुद्ध इन्कॉर्पोरेटेड कौन्सिल ऑफ लॉ रिपोर्टिंग या प्रकरणात निर्णित करण्यात आले व तेव्हापासून पुढे अनुसरले गेले की 'व्यापार करणाऱ्या लोकांनी नफा मिळावायलाच हवा हे आवश्यक नाही किंवा त्या व्यापार करणाऱ्या लोकांची नफा कमविण्याची अपेक्षा वा इच्छा असणे देखील आवश्यक नाही. तसे नसेल तर ऐरवी व्यापार म्हटले जाणार कार्य एखादी व्यक्ती करत असेल तर ती व्यक्ती

असे म्हणू शकते की ती कोणताही व्यापार करत नाही कारण त्यापासून नफा कमविणे हा तीचा उद्देश नाही, हे अर्थातच हास्यास्पद ठरेल. त्या कार्याला व्यापार, व्यवसाय, उदीम किंवा इतर कोणत्याही नावाने संबोधले जाते की नाही किंवा तो कोणत्या हेतूने चालविला गेला हे महत्वाचे नसुन ते कार्याने खरोखरच उत्पन्न निर्माण केले आहे का हा महत्वपुर्ण प्रश्न आहे. श्री. शास्त्री यांनी आम्हाला सटेडफोर्ड विरुद्ध बेलो यात न्या. रॉलेट यांचे दाखविलेले निरिक्षण की निवृत्त मुख्याध्यपकाला देण्यात येणाऱ्या निवृत्तीवेतनावर कोणताही कर आकारला जाऊ शकत नाही कारण ‘त्यात व्यवसायाची पार्श्वभूमी नाही’ हे; नफा मिळविण्याच्या हेतूशिवाय कोणताही व्यापार, व्यवसाय किंवा उदीम असू शकत नाही, असे प्रस्थापित करण्याच्या अशा उद्देशाने नव्हते. निवृतीवेतनावर तेव्हाच कर लादला जावू शकतो जेव्हा ते एखादे पद धारण केले असल्यामुळे मिळाली असेल. त्यात ह्या एकाच मुद्द्यावर निर्णय देण्यात आला आहे की अशाप्रकारे त्यांना ते निवृतीवेतन न मिळता ते निवृत्तीवेतन मिळण्याच्या आधीच ते मुख्याध्यापक सेवानिवृत्त झालेले होते: ब्रिटीश वरिष्ठ सभागृहाच्या प्रकरणात हे प्रकरण पहावे. म्हणून आम्हाला असे वाटते की या प्रकरणात अपीलकर्त्याने वेदांताची जी शिकवण दिली आहे त्याला त्याने केलेला उदीम असे व्यवस्थितपणे म्हणता येईल.

दुसरा मुद्दा ठरवायचा आहे की, लेव्हीने दिलेली रकम ही अपीलकर्त्याला वेदांत शिकवण्याच्या व्यवसायातून मिळालेले उत्पन्न होते का? युक्तिवादादरम्यान भारतीय आणि इंग्रजी अशा दोन्ही प्रकारच्या अनेक न्यायनिर्णय आम्हाला देण्यात आले. ऐच्छिक रक्कम प्राप्तीबाबतीत, जर त्या रकमा घेणाऱ्याच्या निव्वळ वैयक्तिक कारणास्तव दिल्या असतील आणि त्याच्या पद किंवा व्यवसायाशी संबंधित नसेल तर त्यावर कोणताही कर आकारला जाऊ शकत नाही, पण जर तो घेणा-याच्या पदामुळे किंवा व्यवसायामुळे केला गेला असेल तर तो करपात्र असेल या सर्वमान्य तत्त्वाचा वापर या प्रकरणांमधून स्पष्ट होतो. या प्रकरणात त्यांची चर्चा करणे आम्हाला फायद्याचे वाटत नाही. तसेच सध्याचे प्रकरण इतके सोपे आहे की, त्याकरिता कोणत्याही न्यायनिर्णयाची गरज भासू शकत नाही. मुद्दा एवढाच आहे की, अपीलकर्त्याला त्याच्या उदीम-व्यवसायामुळे पैसे

मिळाले होते का? ह्या रकमांची प्राप्ती निव्वळ वैयक्तिक भेट असल्याचे वस्तुस्थितीवरून दिसून येते, असे श्री. शास्त्री यांनी प्रतिपादीत केले. त्यांनी आमचे लक्ष लेव्हीच्या शपथपत्राकडे वेधले ज्यात असे म्हटले आहे की "मी त्यांच्या खात्यात भरलेली सर्व रक्कम त्यांच्याबद्दल आदर आणि आपुलकी दर्शविण्यासाठी भेट आहे आणि इतर कोणत्याही कारणासाठी नाही" हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे की देणा-याला तो काय करत आहे याबाबत काय वाटत होते हे महत्वाचे नसुन घेणा-याला का मिळाले आहे हे महत्वाचे आहे. तर हर्बर्ट विरुद्ध मॅकक्काड या प्रकरणात कॉलिन्स एम. आर. यांनी अंतर्देशीय महसुल विरुद्ध स्ट्राँग च्या पान नं.६४९ वर म्ह्टले आहे:

“आता तो निर्णय, मग तो वस्तुस्थितीनुसार न्यायोचित असो वा नसो, कायद्याच्या तत्वाने निश्चितच झाले आहे की, देणा-याने ऐच्छिक स्वरुपात जरी त्या प्राप्ती रकमा दिल्या असल्या तरी त्या करपात्र आहेत आणि त्याची कसोटी अशी आहे की त्या रकमा प्राप्त करणा-याच्या दृष्टीने त्याच्या पदधारणेमुळे मिळाल्या आहेत का आणि जर तश्या मिळाल्या असतील तर त्या देणा-याने ऐच्छिक स्वरुपात दिलेल्या आहे की अनैच्छिक स्वरुपात दिलेल्या आहे याने काही फरक पडत नाही. हिच ती कसोटी असल्याचे मला वाटते व ती आपण समजुन घेतली तर ते पैसे एखाद्या व्यक्तीकडे आले किंवा प्राप्त झाले आहेत - तर मला असे वाटते की आयकराची जबाबदारी केवळ या कारणास्तव नकारात्मक होत नाही की ज्या व्यक्तींनी पैसे दिले आहेत त्या व्यक्तीवर ते देण्याचे कोणतेही कायदेशीर बंधन नव्हते ”

न्या. रॉलेट यांनी रीड विरुद्ध सेयमोर प्रकरणात मांडल्यानुसार अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये, "पण ते वैयक्तिक भेटीच्या स्वरूपात आहे की मोबदला स्वरुपात " हा खरा प्रश्न असल्याचे तत्व प्रस्थापित आहे. जेव्हा हे प्रकरण ब्रिटीश वरिष्ठ सभागृहात गेले होते, तेव्हा हे निरीक्षण व्हिसकाऊंट केव्ह, एल. सी. यांनी "जर नंतरचे असेल तर ते करपात्र असेल तर आधीचे असेल तर करपात्र नाही." असे मान्यतापुर्वक उद्धृत केले होते. अपीलकर्त्याने दिलेल्या शिकवणीच्या मोबदल्यात त्याला त्या रकमा दिल्या गेल्या नाहीत, असे या प्रकरणात गृहीत धरणे

आम्हाला अशक्य वाटते. अपीलकर्त्याच्या शिकवणीचा फायदा मिळाल्याची कबुली लेव्ही यांनी दिली आहे. शिकवणीमुळेच ही रक्क्म भेट म्हणून दिली गेली हे आमच्यासाठी सुस्पष्ट आहे. हे खरे आहे की लेव्हीने सांगितले की त्याने अपीलकर्त्याबद्दल आदर आणि आपुलकी दर्शविण्यासाठी रक्कमा भेट म्हणून दिल्या आहेत. परंतु अशा भावना आणि त्यातून दिलेली भेट हे स्पष्टपणे अपीलकर्त्याने दिलेल्या शिकवणीचा परिणाम होती. पण लागोपाठच्या कारणांचा शोध घेण्याचा आणि परिणामी दिलेल्या रक्कम भेटीला शिकवणीशी जोडण्याचा आम्हाला अधिकार नाही, असे शास्त्री यांचे म्हणणे आहे. अशा प्रकारचा युक्तिवाद ब्लॅकीस्टन विरुद्ध कूपर मध्ये करण्यात आलेला दिसतो आणि लॉर्ड ॲशबॉर्न यांनी खालील शब्दांत तो हाताळला आहे. “असे सुचवले गेले की दिलेली भेट ही व्हिकरला सन्मान म्हणून वैयक्तिक भेट म्हणून दिले गेली होती. दान म्हणून रक्कम मिळवण्यात आणि वाढवण्यात त्या कारणांनी वाटा उचलला यात शंका नाही. पण त्या व्हिकरला व्हिकर म्हणूनच देण्यात आल्या होत्या आणि त्यांनी त्याच्या पदधारणेमुळे मिळणाऱ्या नफ्याचा एक भाग बनवला होता, याबद्दल मला शंका नाही.” या प्रकरणात आम्हाला शंका नाही की शिकवणी ही त्या रकमेची भेट देण्याची अनिवार्यता नव्हे तर तत्कालिक कारण होते. वेदांताचे ज्ञान घेण्यासाठी जेव्हा जेव्हा लेव्ही आला तेव्हा तेव्हा त्या निरंतरतेनेच त्या रकमा वारंवार देण्यात आल्या आहेत. पहिली रु. २,४१,१०३-११-३ ची इतकी मोठी रक्कम मोबदल्याच्या स्वररुपात देणे अशक्य असल्याच्या श्री. शास्त्री यांच्या युक्तीवादाने आम्हाला प्रभावित केले नाही. कोणत्याही परिस्थितीत ती रक्कम या प्रकरणात आमच्या विचाराधीन नाही. त्या लहान रकमा आमच्या विचाराधीन आहेत की ज्यांच्यासाठी असे म्हटले गेलेले नाही की त्या शिकवणीचा मोबदला म्हणून देणे शक्य नाही. हे विसरता कामा नये की, हे ऐच्छिकपणे दिलेल्या रकमेचे प्रकरण आहे आणि म्हणून शिकवणीच्या पैशाच्या स्वरुपात मिळालेल्या मोबदला मुल्यांकन फारसे महत्वाचे नाही. जर मिळालेली पहिली रक्क्म ही शिकवणीचा मोबदला होणार नाही इतकी मोठी होती तर ती निव्वळ भेट म्हणूनही देता येणार नाही इतकी मोठी होती.

ज्या रकमांशी आमचा संबंध आहे, त्या रकमा वेदांताचे शिक्षक म्हणून अपीलकर्त्याच्या

व्यवसायातून आलेले उत्पन्न आहे, असे आम्ही मानतो. कायद्याच्या कलम ४(३)(७) अन्वये सूट देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही आणि त्या कलमांतर्गत त्या रकमांना सूट मिळण्यासाठी, त्या व्यवसाय केल्यातून मिळालेल्या नाहीत हे दर्शवावे लागेल असे आमचे मत आहे. आम्ही या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहोत की हे अपील अयशस्वी होते आणि ते या न्यायालयाच्या खर्चासह फेटाळले जाते.

अपील फेटाळले जाते.

—x—x—x—x—x—

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x